**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बापू कोंडिबा जाधव
व्दारा मु.३९१/८१ई, आकाशदीप,
जि.प.शाळेजवळ, यशवंतनगर, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता.वाळवा, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, श्री संत सेना समाज सहकारी
भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.७.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बापू कोंडिबा जाधव
व्दारा मु.३९१/८१ई, आकाशदीप,
जि.प.शाळेजवळ, यशवंतनगर, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता.वाळवा, जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, श्री संत सेना समाज सहकारी
भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.११.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री संत सेना समाज सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेचे सन १९७० माहे जानेवारी ते जुलै २००६ अखेरचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा नोटीस, तसेच विशेष सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त, तहसीलदार; वाळवा यांनी दि.३१.५.२००४ रोजी जा.क्र.वशी /२०७/२००४ नुसार दिलेल्या नोटिशीची प्रत, सहाय्यक नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग, सांगली यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या नकला इ. | |

## विवेचन

श्री.सहदेव रामचंद्र झेंडे यांनी श्री संत सेना समाज सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेकडे जानेवारी १९७० ते जुलै २००६ अखेरपर्यंतच्या काळातील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, तहसीलदार ; वाळवा यांनी दिलेल्या नोटिशीची प्रत, सहाय्यक नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग, सांगली यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या नकला इ.११ मुद्यांची माहिती मागितली होती. आपल्या संस्थेला माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू होत नसल्याचे उत्तर देऊन संस्थेच्या अध्यक्षांनी ही माहिती नाकारली. परंतु ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी झाली असून त्याचे कामकाज शासनाच्या सहकार खात्याच्या नियंत्रणाखाली चालते व शासनाने या संस्थेला सवलतीच्या दरात जमीन दिली आहे, त्यामुळे केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ या संस्थेला लागू होतो, असा

निर्णय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.ए.जी.चालक यांनी दिला. त्याविरुध्द संस्थेचे अध्यक्ष श्री.बापू कोंडिबा जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.झेंडे आणि संस्था यांच्या परस्परांमधील वादाची पार्श्वभूमी या विषयाला आहे. तसेच मागितलेली माहिती ३६ वर्षांतील आहे

श्री.सहदेव रामचंद्र झेंडे हे संस्थेचे सभासद नाहीत. श्री.प्रदीप आनंदराव जाधव, रा.आष्टा यांनी संस्थेच्या जागेत अतिक्रमण केले आहे. ते काढण्याच्या कारवाईमध्ये श्री.प्रदीप आनंदराव जाधव व त्यांचे मुखत्यार श्री.सहदेव रामचंद्र झेंडे हे व्यत्यय आणत आहेत. श्री.झेंडे यांनी संस्थेची सर्व कागदपत्रे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता.वाळवा यांच्याकडून यापूर्वीच घेतलेली आहेत. अन्य ठिकाणाहूनही त्यांनी संस्थेच्या संबंधित कागदपत्रांच्या नकला माहितीच्या अधिकाराखाली घेतल्या आहेत, तीच कागदपत्रे ते संस्थेला त्रास देण्यासाठी पुन्हा मागत आहेत, असे श्री.जाधव यांनी आयोगापुढे लेखी व तोंडी नमूद केले. १९६८ साली जिल्हाधिकाऱ्यांनी तत्कालीन प्रचलित दराने संस्थेला जमीन विकत दिलेली आहे. शासनाने विनामोबदला जमीन दिलेली नाही, अन्य कोणतीही मदत शासनामार्फत संस्थेला मिळत नाही, त्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण ' ठरत नाही, असे प्रतिपादन संस्थेचे वकील ॲड. ए.बी.पाटील यांनी केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.ए.जी.चालक यांनी लावलेला अन्वयार्थ योग्य असून त्यांच्या आदेशानुसार संस्थेने माहिती देणे आवश्यक आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, वाळवा यांनी प्रतिपादन केले.

श्री.झेंडे यांनी मागितलेली माहिती ३६ वर्षांच्या कालावधीतील व विस्तृत अशी आहे. त्यातील काही कागदपत्रे संस्थेकडे उपलब्धही नाहीत, असेही श्री.पाटील आणि श्री.जाधव यांनी स्पष्ट केले.

नियंत्रणाच्या अनुषंगाने सार्वजनिक प्राधिकरणाबाबत तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.ए.जी.चालक यांनी लावलेला अन्वयार्थ स्वागतार्ह असला तरी राज्य माहिती आयोगाने याबाबत अंतिम निर्णय केलेला नाही. त्यामुळे संस्थेने शक्य तेवढी माहिती देणे योग्य ठरेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) श्री संत सेना समाज सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेने शक्य असेल ती माहिती अपीलकर्त्यास योग्य शुल्क आकारुन द्यावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २३.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.जयश्री प्र. जोशी
व्दारा श्रीमती वनमाला गणेश बाहुलीकर
महेंद्रनगर, मु.पो.करमाळा, जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, विद्या विकास मंडळ,
करमाळा, जि.सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.९.२००७ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, विद्या विकास मंडळ, करमाळा, जि.सोलापूर
श्री.विलास रामचंद्र घुमरे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
करमाळा, जि.सोलापूर श्री. जयप्रकाश कोंडिबा बिले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>माझ्या नियुक्तीसंदर्भातील नियुक्तीपत्राची छायांकित प्रत, महाविद्यालयाने शिक्षण खाते व सक्षम अधिकाऱ्यांशी केलेला पत्रव्यवहार, तसेच मंजूर प्रस्तावाच्या प्रती, विद्या विकास मंडळाने केलेला ठराव, भविष्य निर्वाह निधी जमा रक्कम व कार्यालयाचा पत्ता, शिक्षकेतर सेवकांची २००१ पासूनची सेवातज्येष्ठता यादी, सन २००१ पासून रिक्त पदाची कार्यालयीन कर्मचाऱ्यांची माहिती, सन डिसेंबर २००१; डिसेंबर २००२; डिसेंबर २००३; डिसेंबर २००४; ऑक्टोबर २००५ या महिन्यांचे पगाराचे प्रमाणपत्राची प्रत, तसेच १ डिसेंबर २००१ पासून हजेरीपत्रकावर सह्या केल्या आहेत त्या हजेरीपत्रकाच्या छायांकित प्रती. |

## विवेचन

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयात झालेल्या आपल्या नियुक्तीबाबतच्या पत्राच्या छायांकित प्रमाणित प्रती, नियुक्तीच्या मान्यतेसाठी महाविद्यालयाने शिक्षण खात्याशी व सक्षम अधिकाऱ्यांशी केलेला पत्रव्यवहार, आलेली उत्तरे इत्यादी माहिती अपीलकर्ता सौ.जयश्री प्रल्हाद जोशी यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री.जयप्रकाश कोंडिबा बिले यांच्याकडे मागितली होती. चुकीची व अपूर्ण माहिती मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, विद्या विकास मंडळ, करमाळा, जि.सोलापूर यांच्याकडे अपील केले. सचिवांनी निर्णय दिला नाही, असे नमूद करुन सौ.जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सौ.जोशी या उपरोक्त महाविद्यालयात ग्रंथालय परिचर म्हणून काम करीत होत्या. त्यांना सेवेतून मुक्त केल्यामुळे पुन्हा कामावर घेण्यासाठी दबाव आणण्याकरिता त्या अशा प्रकारे अर्ज करीत आहेत, असे जन माहित अधिकारी श्री.जयप्रकाश कोंडिबा बिले व अपिलीय प्राधिकारी श्री.विलास रामचंद्र घुमरे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. आपल्या अपिलाचा निर्णय देण्यात आला नाही, असे सौ.जोशी यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे, परंतु त्या सुनावणीस उपस्थित राहिल्या नाहीत. कागदपत्रांची शहानिशा करुन आपण अपील निकाली

काढले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, विद्या विकास मंडळ, करमाळा श्री. विलास रामचंद्र घुमरे यांनी नमूद केले आहे.

संस्थेतील विश्वस्त श्रीमती वनमाला बाहुलीकर यांच्या स्नुषा असल्यामुळे कोणतेही पद अस्तित्वात नसताना केवळ सद्भावना म्हणून तात्पुरत्या स्वरुपात सौ. जोशी यांना नियुक्ती देण्यात आली होती. त्यासाठी आवश्यक असलेली शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर यांची पूर्वपरवानगी तेव्हा घेतली नव्हती. त्यांनी ती परवानगी नाकारल्यामुळे त्यांच्या पगाराचा भूर्दंड संस्थेला सोसावा लागला. एक महिन्याची पूर्वसूचना देऊन त्यांना सेवेतून कमी करण्यात आले. त्यांनी मागितलेली सर्व माहिती विनाशुल्क आणि मुदतीत दिली आहे, परंतु भविष्य निर्वाह निधी खातेच काढले नसताना त्याचा क्रमांक द्यावा यासारखी माहिती त्या मागत आहेत, ती देणे शक्य नाही. अन्य सर्व माहिती त्यांना दिलेली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सचीव श्री.विलास रामचंद्र घुमरे यांनी लेखी व तोंडी सांगितले.

आपल्या नियुक्तीच्या व कमी करण्याच्या संदर्भात चौकशीची मागणी सौ.जोशी यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात केलेली आहे. परंतु केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत ही बाब येत नाही. आपल्या वैयक्तिक स्वातंत्र्याशी निगडित असल्याने ही माहिती ४८ तासात मिळावयास हवी होती, हा त्यांचा दावाही निरर्थक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २९.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबू शिरोळे
रा.आरएइडी/एसआरजी,आयएसआरओ,
सॅटेलाईट सेंटर, विमानपूरा, बेंगलोर-१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सिध्देश्वर इंग्लीश हायस्कूल,
सिध्देश्वर पेठ, सोलापूर उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | २७० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.९.२००७ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सिध्देश्वर इंग्लीश हायस्कूल,
सिध्देश्वर पेठ, सोलापूर सौ.ए.एस.तिवारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

सौ. कशम्मा बनसिध्दप्पा गायकवाड, शिक्षक श्री सिध्देश्वर इंग्लिश हायस्कूल, सिध्देश्वर पेठ, सोलापूर यांच्या नेमणुकीपासून अर्ज करेपर्यंतच्या काळातील सेवा पुस्तक व त्यामध्ये असलेला कौटुंबिक तपशील.

## विवेचन

श्रीमती कशम्मा बनसिद्दप्पा गायकवाड या शिक्षिकेबद्दलची शाळेत रुजू झाल्यापासूनची सेवाविषयक तपशीलवार माहिती अपीलकर्ता श्री.बाबू शिरोळे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सिध्देश्वर इंग्लिश मिडियम हायस्कूल, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून श्री.शिरोळे यांच्या दोन अर्जांना माहिती दिली न गेल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांना माहिती त्वरित देण्यास कळविले, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी याबाबत सुनावणीही घेतली. श्री.शिरोळे यांनी शाळेकडे, तसेच शिक्षण उपसंचालक आदिंकडेही याच माहितीसाठी विविध प्रकारचे अर्ज केले होते. पती-पत्नीमधील वादाचा हा एक भाग होता. आता तो विषय संपला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ. ए.एस.तिवारी व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.एम.एन.वीर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री.शिरोळे यांनी दि.३.३.२००६ रोजी आयोगाकडे अपील केले आहे, मात्र दि.२४.३.२००६ रोजी शिक्षणाधिकारी कार्यालयात सुनावणी होऊन सर्व माहिती मिळाली असल्यामुळे तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने सांगितल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सौ.ए.एस.तिवारी व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.एम.एन.वीर यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ३०.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तमप्रकाश दिगंबर नवघरे
रा.२१८/८३, आदर्शनगर, एम.आय.डी.सी.पोस्ट,
सोलापूर-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक);
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक);
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.के.सगरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मुख्याध्यापक संघाकडून २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये पेपरफुटी प्रकरणी शिक्षणाधिकारी यांनी केलेली कारवाई, श्री. आनंद सायबु क्षीरसागर यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत त्यांना न्याय मिळणेसाठी केलेली कारवाई, दि.२९.११.२००५ रोजी डॉ.आंबेडकर स्टुडंटस् असोसिएशनच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनावर केलेली कार्यवाही.

## विवेचन

मुख्याध्यापक संघाकडून सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये पेपरफुटी प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक); जिल्हा परिषद, सोलापूर यांनी काय कारवाई केली, श्री. आनंद सायबू क्षीरसागर यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत दिलेल्या निवेदनावर झालेली कार्यवाही, शिक्षणाधिकारी (माध्यमिक); जिल्हा परिषद, सोलापूर यांना दि. २९.११.२००५ रोजी डॉ. आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशनच्या वतीने दिलेल्या निवेदनावर झालेली कार्यवाही, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. उत्तमप्रकाश दिगंबर नवघरे यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक); जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक); जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले होते. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. व्ही. जी. हाके यांनी अपिलाची दखल घेतली नाही. या कारणावरुन श्री. नवघरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

दरम्यानच्या काळात आपल्याला शिक्षणाधिकारी (माध्यमिक); जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून आवश्यक माहिती मिळाली असल्याने अपील मागे घेत असल्याचे निवेदन श्री. नवघरे यांनी आयोगाला सादर केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपीलकर्त्याची तक्रार राहिलेली नसल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २८.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता,
प्लॉट नं.३२०, फ्लॅट नं.२, सेक्टर नं.२६,
महावीर कॉम्प्लेक्स, पिसीएनटीडी,
निगडी, पुणे- ४११ ०४४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
मुख्य अभियंता, — उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि.
पुणे परिमंडळ, प्रशासकीय इमारत,
रास्ता पेठ, पुणे-४११ ००१

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि.
पुणे परिमंडळ, प्रशासकीय इमारत,
रास्ता पेठ, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.८.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता, प्लॉट नं.३२०, फ्लॅट नं.२, सेक्टर नं.२६, महावीर कॉम्प्लेक्स, पिसीएनटीडी, निगडी, पुणे- ४११ ०४४

**अपिलीय प्राधिकारी** मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि.,
पुणे परिमंडळ, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे-४११ ००१
श्री. र. ब्रि. गौतम

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि.,
पुणे परिमंडळ, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे-४११ ००१
सौ. मनिषा जयंत प्रयाग

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, पुणे परिमंडळ यांनी ग्राहकांच्या मीटर रिडिंगचे काम कंत्राटी पध्दतीने दिले आहे काय, पुणे विभागात किती कत्रांटदारांना हे काम देण्यात आले आहे, व मागील वर्षाच्या प्रत्येक कत्रांटदारांची वार्षिक रक्कम काय आहे, आळंदी उप विभागात कत्रांटदार व त्यांच्या बाबतचा तपशील काय आहे, त्यासाठी किती मनुष्यबळ वापरण्यात येत आहे, जानेवारी २००४ ते ऑक्टोबर २००६ पर्यंत कार्यालय ४६, ४७ प्राधिकरण उपविभाग, आळंदी या कार्यालयाने किती ग्राहकांच्या बिलात दुरुस्ती केली, त्याचा महिनावार तपशील

## विवेचन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, पुणे परिमंडळ यांनी ग्राहकांच्या मीटर रिडिंगचे काम कंत्राटी पध्दतीने दिले आहे काय, पुणे विभागात किती कत्रांटदारांना हे काम देण्यात आले आहे व मागील वर्षाच्या प्रत्येक कत्रांटदारांची वार्षिक रक्कम काय आहे, आळंदी उप विभागात कत्रांटदार व त्यांच्या बाबतचा तपशील काय आहे, त्यासाठी किती मनुष्यबळ वापरण्यात येत आहे, जानेवारी २००४ ते ऑक्टोबर २००६ पर्यंत कार्यालय ४६, ४७ प्राधिकरण उपविभाग, आळंदी या कार्यालयाने किती ग्राहकांच्या बिलात दुरुस्ती केली, त्याचा महिनावार तपशील इत्यादी तपशीलवार माहिती अपीलकर्ता श्री. जितेंद्र भानुशंकर मेहता यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., पुणे परिमंडळ, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे

यांच्याकडे मागितली होती. काही मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली, परंतु अपूर्ण माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री. मेहता यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, पुणे परिमंडळ, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे ४११००१ यांच्याकडे अपील केले. त्यानंतर परिपूर्ण माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. मेहता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. मेहता यांनी तांत्रिक व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ती देण्याचा प्रयत्न आपण केला, परंतु प्रत्यक्षात त्यातील चार मुद्दयांसाठी संपूर्ण पुणे विभागाची माहिती एकत्र करणे आवश्यक असून ते व्यापक स्वरुपाचे काम असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. साळुंखे यांच्याकडून काही मुद्यांचा तपशील दिला गेला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, पुणे परिमंडळ, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे ४११००१ श्री. र.ब्रि. गौतम यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी निवृत्त होणे, त्यांची बदली होणे अशा कारणांमुळे त्या काळात माहितीच्या सकंलनात व्यत्यय आला, असे श्री. गौतम यांनी स्पष्ट केले. अपिलीय प्राधिकारी व मुख्य अभियंता यांच्याकडे श्री. मेहता यांनी अपील करावयास हवे होते, तसे त्यांना कळवूनही त्यांनी तसे अपील केले नाही व मुख्य अभियंता यांच्याकडूनच अपिलाची दखल घेण्याचा हट्ट कायम ठेवला, असेही त्यांनी स्पष्ट केले. वीज बिलाच्या संदर्भातील काम कत्रांटदाराचे असून ते योग्यरीतीने पार पाडले जात नाही. वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना समाधानकारक उत्तरे व चांगली वागणूक मिळत नाही. बील दुरुस्तीसाठी तक्रार निवारण अर्जाकरिता एक रुपया घेतला जातो, झेरॉक्स प्रत बाहेर काढून घेण्यासाठी ग्राहकाला एक रुपया खर्च करावा लागतो. कत्रांटदार नेमले असताना त्यांचे काम वीज मंडळाचे कर्मचारी करतात. मग कंत्राटदारांना नेमके कशाचे पैसे दिले जातात, असा प्रश्न निर्माण होतो. आपली तक्रार निवारण करुन घेण्यासाठी ग्राहकाला भूर्दंड बसतो. हे सारे आपण मागितलेल्या माहितीतून स्पष्ट होईल, असे प्रतिपादन श्री. मेहता यांनी केले. शास्तीची आपली मागणी नाही, आपल्याला संपूर्ण माहिती मिळावी एवढीच अपेक्षा आहे, असे श्री. मेहता यांनी नमूद केले.

दिलेल्या माहितीचे तक्ते वेगळ्या स्वरुपात कसे करता येतील, तसेच त्यावरुन निघणाऱ्या निष्कर्षांना जबाबदार कोण, अशा स्वरुपाचे प्रश्न श्री. मेहता यांनी अपिलामध्ये उपस्थित केले आहेत.

परंतु यासारख्या भाष्याची 'माहिती'च्या संदर्भात दखल घेण्याचे कारण नाही. श्री. मेहता यांनी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची आहे, तसेच अनेक स्पष्टिकरणात्मक भाष्य त्यांनी मागितले आहे. ते 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. मूळ अर्जात त्यांनी मागितलेल्या माहितीतील द्यावयाच्या राहिलेल्या माहितीचा नेमकेपणा त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना सादर करावा, त्यानुसार दि. ५.९.२००७ पर्यंत माहिती देऊ, असे अपिलीय प्राधिकारी श्री. गौतम यांनी सांगितले.

श्री. मेहता यांनी उपस्थित केलेले मुद्दे महत्त्वाचे असले तरी 'माहिती' या सदरात येणाऱ्या मुद्यांची दखल केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये घेता येईल. अर्ज अथवा अपील याबाबत विहित प्रक्रियेचे पालन अपीलकर्त्याने करणे आवश्यक आहे, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. श्री. मेहता यांनी ऊर्वरित माहितीचा तपशील सादर केल्यावर दि. ५.९.२००७ पर्यंत त्यांना माहिती देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार माहिती दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, पुणे परिमंडळ, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे-४११ ००१ श्री. गौतम यांनी दि. ३.९.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे. परंतु तरीही आपल्याला काही तपशील मिळाला नसल्याचे श्री. मेहता यांचे म्हणणे आहे. मात्र मूळ अर्जाप्रमाणे त्यांना संपूर्ण माहिती देण्यात आली आहे, असे दिसते. राहिलेल्या तपशिलाबाबत त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती निःशुल्क द्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २६.११.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र नारायण जाधव,
२०, दत्तमंदिर, जकात नाक्याजवळ, सांगलीवाडी,
ता. मिरज, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सांगली विभाग, सांगली — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सांगली विभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९९/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.७.२००७ |

३ उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली विभाग, सांगली
श्री. एम. के. डोंगरे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सांगली विभाग, सांगली श्री. बी. आर. नागरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.८.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.१०.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.३.२००६ |

८. मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सन १९९० ते जुलै २००५ अखेरपर्यंत किती सार्वजनिक न्यासांची नोंद झाली, त्यांची एकूण संख्या, नोंद झालेल्या न्यासांची नांवे व नोंदणी क्रमांक, त्यांच्या अध्यक्षांची नावे व पत्ते, हिशेब सादर करणाऱ्या - न करणाऱ्या न्यासांची नावे, त्यांच्यावरील कारवाईचा तपशील

## विवेचन

सांगली विभागात धर्मादाय आयुक्त कार्यालयात सन १९९० ते जुलै २००५ अखेरपर्यंत नोंद झालेल्या सार्वजनिक न्यासांची संख्या, नावे, नोंदणी क्रमांक, अध्यक्षांची नावे व पत्ते, मुदतीत हिशेब सादर करणाऱ्या व न करणाऱ्या न्यासांची संख्या व नावे, हिशेब सादर न करणाऱ्या न्यासांना दिलेल्या नोटिसा व किती जणांवर कारवाई केली, कारवाई न केलेल्या व्यक्तींची व न्यासांची संख्या इत्यादी बारा मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. रामचंद्र नारायण जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली यांच्याकडे मागितली होती. या माहितीसाठी रूपये ७०,०००/- शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री. जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली विभाग, सांगली यांच्याकडे अपील केले. त्यांनी ते फेटाळले. त्याविरुध्द श्री. जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. जाधव यांनी दि. २०.८.२००५ रोजी केलेला माहिती मागणीचा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये केलेला आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतर हा कायदा रद्दबातल झाला असूनही आयोगाने अपील दाखल करुन घेतले. अपीलकर्ता हे सुनावणीला उपस्थित नव्हते.

श्री. जाधव यांनी मागितलेली माहिती पंधरा वर्षांच्या कालावधीतील असून सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली यांच्या अखत्यारीत ७७९९ न्यास येतात. ही माहिती व्यापक असल्यामुळे व कार्यालयात अपुरा कर्मचारी वर्ग व संगणकाचा अभाव असल्यामुळे अशी माहिती एकत्र न ठेवल्यामुळे छायांकित प्रतीच्या स्वरुपातली देण्याची तयारी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली श्री. ला.ना. सांगरुळकर

(सध्या सेवानिवृत्त) यांनी दर्शविली होती. श्री. जाधव यांनी शुल्क न भरल्यामुळे अर्ज निकाली काढण्यात आला, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय श्री. बी. आर. नागरे यांनी सांगितले. श्री. जाधव यांच्या अपिलाच्या सुनावणीसाठी तीन वेळा तारीख नेमली होती, परंतु ते हजर राहिले नाहीत. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेली रक्कमही त्यांनी भरली नाही, त्यामुळे अपील फेटाळण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली विभाग, सांगली श्री. एम. के. डोंगरे यांनी नमूद केले.

श्री. जाधव यांनी मागितलेली माहिती पंधरा वर्षांच्या काळातील व व्यापक तपशिलाची आहे. मात्र आपल्याला ती छायांकित प्रतींच्या स्वरूपात न देता संकलित स्वरूपात एकत्र दिली जावी, असे श्री. जाधव यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना त्यावेळी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. अपुरा कर्मचारी वर्ग व साधनसामग्रीची मर्यादा लक्षात घेता, एवढी सर्व माहिती संकलित स्वरूपात देणे शक्य नाही. श्री. जाधव यांनी शुल्क भरल्यास छायांकित प्रती देता येतील अथवा अभिलेखाची पाहणी करुन विशिष्ट कागदपत्रांची त्यांनी मागणी केल्यास त्यांच्या प्रती देता येतील, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली श्री. बी. आर. नागरे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सांगली विभाग, सांगली श्री. एम. के. डोंगरे यांनी स्पष्ट केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. अपीलकर्ता यांनी आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क भरुन उपलब्ध स्वरूपातील माहिती प्राप्त करुन घ्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २२.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाषचंद्र बसलिंगप्पा नागूर
मु. पो. मैंदर्गी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा प्रकल्प अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुभाषचंद्र बसलिंगप्पा नागूर,
मु. पो. मैंदर्गी, ता.अक्कलकोट,जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. अे.एम. वायकोळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.९.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.४.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर या नगरपरिषदेतील गैरकारभाराची संपूर्ण व नि:पक्षपाती चौकशी न झाल्याबाबत मुद्देनिहाय खुलासा करावा

## विवेचन

मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर या नगरपरिषदेतील गैरकारभाराची संपूर्ण व नि:पक्षपाती चौकशी न झाल्याबाबत तक्रार करणारा व काही मुद्यांचा खुलासा मागणारा अर्ज अपीलकर्ता श्री. सुभाषचंद्र बसलिंगप्पा नागूर यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. अे.एम. वायकोळे यांच्याकडे केला होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याबाबतची माहिती विहित मुदतीत दिली. परंतु त्याने समाधान न झाल्याने श्री. नागूर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे अपील केले. परंतु आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नाही. नगरपरिषदेतील कारभारात झालेल्या चौकशीत कायद्याच्या उल्लंघनाची, तसेच जाहीर निविदा प्रसिध्द न झाल्याची दखल घेतली नाही, असे श्री. नागूर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलात व पूरक नमूद केले आहे.

मैंदर्गी नगरपरिषदेत गैरकारभार व मुख्याधिकाऱ्यांचा मनमानी कारभार चालू असल्याची तक्रार श्री. नागूर यांनी लोकशाही दिनात, अन्य प्रशासकीय यंत्रणाकडे व माहितीच्या अधिकारांतर्गतही केली आहे. त्यांच्या तक्रारीची चौकशी तहसीलदार, अक्कलकोट यांच्यामार्फत करण्यात आली. या चौकशीचा अहवाल श्री. नागूर यांच्या विरोधात गेल्याने ते त्याबाबत विविध स्वरुपाचे अर्ज व अपिले करीत आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री. अे. एम. वायकोळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. ही चौकशी आपल्याला मान्य नसल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांकडील,

तसेच आयोगापुढील सुनावणीला श्री. नागूर उपस्थित नव्हते. विहित मुदतीत माहिती देऊनही विविध मुद्यांच्या खुलाशाची मागणी ते करतात. अशा प्रकारे तक्रारींचा खुलासा करणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर श्री. मधुकर आर्दड यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे.

श्री. नागूर यांना आवश्यक ती माहिती देण्यात आली आहे. परंतु केलेली चौकशी मान्य नसून कार्यवाहीचा कायदेशीरपणा - बेकायदेशीरपणा तपासून खुलासा करणे हे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेत समाविष्ट होत नाही. सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २८.११.२००७**

राज्य माहिती आयोग

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु.पो.निरा, ता. पुरंदर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सचीव, समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
निरा, ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु.पो.निरा, ता. पुरंदर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
निरा, ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१०.२००५/३.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.३.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

(१) निरा येथील समता ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने कर्जदाराकडून 'इमारत निधी' गोळा केला आहे त्याचा हिशोब अद्याप कोठेही, कधीही प्रसिध्द केला नाही. संचयित केलेल्या निधीच्या संज्ञेत इमारत शब्दाचा अंतर्भाव असल्याने, इमारतीसंबंधी अनुषंगीत अशी इत्थंभूत साद्यंत माहिती तपशीलवार म्हणजे जागेचा ७/१२, एकूण क्षेत्रफळ, बांधकाम निधी, बखळ जागा किती संस्थेच्या वापराखेरीज इमारतीपासून अन्य उत्पन्न किती, सर्व नियोजनास निधी पुरला का कमी पडला, त्याची तरतूद कशी केली अथ्वा नियोजित इमारत होऊनही निधी काही शिल्लक आहे का, तो किती, हा निधी आणखी किती वर्षे होणार, संचालक मंडळाची तरतूद काय?

## विवेचन

मौजे निरा, जिल्हा पुणे येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या सेवकवर्गाची गोवा सहल व संचालक मंडळाची काश्मीर सह, तसेच इमारत निधी व इमारती संबंधीचा तपशील याची माहिती अपीलकर्ता श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के यांना जन माहिती अधिकारी तथा सचीव, समता नागरी सहकारी पतसंस्था यांच्याकडे मागितली होती. परंतु 'आपण संस्थेचे सभासद नसल्यामुळे माहिती देता येणार नाही,' असे सचिवांनी श्री.शिर्के यांना कळविले. त्याविरुध्द श्री.शिर्के यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अपील केले. त्यांनी हे

अपील फेटाळल्यामुळे श्री.शिर्के यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. मुख्य राज्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांचेपुढे त्याची सुनावणी झाली. नागरी सहकारी बँक प्रमाणेच पतसंस्था यासुध्दा 'सार्वजनिक प्राधिकरण' यात संस्था मोडत नाही, म्हणून डॉ.जोशी यांनी श्री.शिर्के यांचे अपील अमान्य करणारा निर्णय पूर्वीच (दि.२५.४.२००७)दिला आहे.

**आदेश**

मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी यापूर्वी दिलेला आदेश लक्षात घेता अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. ८.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गिरीश रघुनाथ मेहेंदळे
रा.गजराज सोसायटी, फ्लॅट नं.११,
पहिला मजला, राजेंद्रनगर, नवी पेठ,
पुणे ४११०३० अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,
जलभवन, तासगांव, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,
जलभवन, तासगांव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१० / पुणे<br>तक्रार क्र.९६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.गिरीश रघुनाथ मेहेंदळे
रा.गजराज सोसायटी, फ्लॅट नं.११,
पहिला मजला, राजेंद्रनगर, नवी पेठ,
पुणे ४११०३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,
जलभवन, तासगांव, जि.सांगली
श्री.डी.व्ही.ठकार

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग,
जलभवन, तासगांव, जि.सांगली
श्री.बी.डी.यमगर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१२.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

(१)बनेवाडी योजनेसंदर्भात ठेकेदाराला भाववाढी देयक अदा करणेसाठी शिफारस केलेल्या पत्राची सहपत्रासह प्रत. तसेच रु.८०,०००/- देयक ठेकेदारास अदा झाले किंवा नाही, नसल्यास कारणांची माहिती.

(२)तत्कालीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कवठेमहांकाळ बांधकाम उपविभागाकडून पत्र क्र.भांडार/१२२, दि.१४.५.२००३ अन्वये शाखा अभियंता यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस केलेली होती. विभागीय कार्यालयाने शिस्तभंगाची कारवाई केली का, असल्यास त्यासंबंधातील कागदपत्रे, नसल्यास त्याची कारणे.

## विवेचन

बनेवाडी, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली येथील नळपाणी पुरवठा योजनेच्या संदर्भातील भाववाढीचे देयक व तत्कालीन कवठेमहांकाळ उपविभागातील शाखा अभियंता यांनी साहित्याचा कार्यभार स्वीकारण्याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.गिरीश रघुनाथ मेहेंदळे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, सांगली

यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती पाठविली, परंतु देयकाच्या संदर्भातील पत्रामध्ये फेरफार असल्याचे नमूद करुन व त्यावेळी देयकासोबत जोडलेल्या भाववाढीचे तक्ते हेतुतः दिलेले नाहीत व अन्य माहिती मिळालेली नाही, अशा कारणांवरुन श्री.मेहेंदळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे अपील केले. दोन महिने होऊनही त्यांनी अपिलाची दखल न घेतल्याच्या कारणावरुन श्री.मेहेंदळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

याच अनुषंगाने श्री.मेहेंदळे यांनी पूर्वीच्या अर्जासंदर्भात (तासगाव उपविभागाकडून साहित्याचा कार्यभार स्वीकारण्याबाबत) विसंगत माहिती पाठविल्याची तक्रार आयोगाकडे केली आहे. अपील व तक्रार यांचा विषय एकच असून मुद्देही एकाच स्वरुपाचे आहेत.

श्री.मेहेंदळे हे महाराष्ट्र जीवन विकास प्राधिकरणाच्या तत्कालीन तासगाव विभागाखाली कवठेमहांकाळ विभागात उपअभियंता होते. त्या काळातील मतभेदांचा संदर्भ त्यांच्या अर्ज व तक्रारींना असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

श्री.मेहेंदळे यांना मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आलेली आहे. बिलातील फेरफाराचा त्यांचा आरोप चुकीचा आहे, बिल दुरुस्ती केल्यामुळे झालेल्या खाडाखोडीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत, असे उपस्थित जन माहिती अधिकारी श्री.बी.डी.यमगर व अपिलीय प्राधिकारी श्री.डी.व्ही.ठकार यांनी सांगितले. तसेच श्री.मेहेंदळे यांना हवी असलेली कोणतीही माहिती देण्यास आपण तयार असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री.मेहेंदळे यांच्या मूळ अर्जात देयकाची रक्कम अंदाजे रु.८०,०००/- असल्याचे म्हटले आहे परंतु आपण नजरचुकीने रु.८०,०००/- नमूद केले होते, ती रक्कम अंदाजे रु.६०,०००/- होती असे त्यांनी प्रथम अपिलात म्हटले आहे. अपीलकर्ता स्वतः अशा प्रकारची गंभीर चूक नजरचूक म्हणून नमूद कशी करु शकतो, असा प्रश्न श्री.बी.डी.यमगर व श्री.डी.व्ही.ठकार यांनी उपस्थित केला, तो रास्त आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.मेहेंदळे यांना माहिती विहित मुदतीत दिली होती. त्यांनी माहिती मागितलेल्या तीनपैकी दोन मुद्दे कारणे विचारणारे आहेत. शिस्तभंगाच्या कार्यवाहीबाबत कारणे विचारणे 'माहिती ' या सदरात समाविष्ट होत नाही. अपिलातील अपुऱ्या व चुकीच्या माहितीच्या आरोपांबाबत जन माहिती अधिकाऱ्यांकडून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अहवाल मागविला. दरम्यानच्या काळात रु.७५/- शुल्क भरण्यास श्री.मेहेंदळे यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले होते. अन्य एका अर्जाच्या संदर्भात श्री.मेहेंदळे यांना ८५/-रु. शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले होते. आपल्याला आधीच्या पत्रात रु.७५/- शुल्क कळविलेले नसल्यामुळे भरणा केलेला नाही. तसेच अन्यअर्जाबाबत 'सदर कागदपत्रांची सध्या जरुरी नसल्याने' रक्कम रु.८५/-भरणा केला नाही, असे श्री.मेहेंदळे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना कळविले. मात्र शक्य तेवढा तपशील जन माहिती अधिकाऱ्यांनी दिला, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी उर्वरित माहिती देण्याचा आदेश दिला. 'आपणांस माहितीची जरुरी नव्हती तर ते आपण यापूर्वीच वेळेत कळविणे आवश्यक होते. त्यामुळे दिलेल्या माहितीचा खर्च विनाविलंब या खात्याकडे भरणा करावा अन्यथा आपले विरुध्द पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी,' असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी श्री.मेहेंदळे यांना दि.२.२.२००६ रोजी कळविले. आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलात श्री.मेहेंदळे यांनी त्याला आक्षेप घेतला आहे. अशा प्रकारच्या कार्यवाहीचा इशारा देणे योग्य नाही हे त्यांचे म्हणणे रास्त आहे. मात्र शुल्क भरण्यास कळविल्यानंतर माहितीची सध्या जरुरी नसल्याची भूमिका घेणे जबाबदारपणाचे नाही.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतरच्या महिन्याभरातील हा विषय असल्यामुळे शुल्क आदी संदर्भात पूर्ण माहिती नव्हती त्यामुळे काही चुका झाल्या, असे श्री.बी.डी.यमगर यांनी सांगितले. त्यांचे हे प्रतिपादन स्वीकारण्यात येत आहे. अपिलीय

प्राधिकाऱ्यांनी अपिलाची सुनावणी विहित मुदतीत केलेली नाही मात्र अपिलाच्या अनुषंगाने त्यांनी कार्यवाही केली होती त्याची माहिती त्यांनी अपीलकर्त्यास देणे आवश्यक होते.

तासगाव उपविभागाकडून आपण साहित्याचा कार्यभार स्वीकारण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती विसंगत असल्याची तक्रार श्री.मेहेंदळे यांनी केली आहे. परंतु दि.७.७.२००६ रोजी मुख्य राज्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांच्यापुढे झालेल्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी 'जी काही माहिती कार्यालयात उपलब्ध असेल ती पाच दिवसांच्या आत अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी ' असे आदेश मुख्य राज्य माहिती आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार माहिती देण्यात आली असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी कागदपत्रांसह स्पष्ट केले आहे. या कागदपत्रातील निष्कर्ष चुकीचे असल्याचा श्री.मेहेंदळे यांचा आक्षेप आहे. परंतु निष्कर्षाचे मूल्यमापन केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व संबंधित कागदपत्रे विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे

**पुणे**
**दि. १७.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रशांत रामचंद्र खोल्लम
द्वारा दत्तात्रय लक्ष्मण बेल्हेकर
धुमाळ बिल्डिंग, सुपेकर गिरणीजवळ
गवळीनगर, भोसरी, पुणे - ३९

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र.२८ निगडी, पुणे ४११०४४

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र. २४, निगडी, पुणे ४११०४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१६ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६. २००७ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** प्रशांत रामचंद्र खोल्लम, द्वारा दत्तात्रय लक्ष्मण बेल्हेकर
धुमाळ बिल्डिंग, सुपेकर गिरणीजवळ, गवळीनगर, भोसरी, पुणे - ३९

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र. २८. निगडी पुणे ४११०४४ श्री. सुगंध. प. उमाप

**जन माहिती अधिकारी** तथा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र. २४ निगडी, पुणे ४११०४४ श्री. अनिल. शं. काळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

मौजे भोसरी येथील सर्व्हे क्रमांक २०/१ क, व सर्व्हे क्रमांक २०/३ हे क्षेत्र ता. ३०.४.१९७० मध्ये तहसीलदार, हवेली यांनी पिंपरी चिंचवड शहर विभागातील औद्योगिक निवास व व्यापार विभागाकरिता संपादित केलेले आहे. सदरची जमीन प्राधिकरण विभागामध्ये असून त्यापैकी किती जमीन प्राधिकरण विभागाने संपादित केलेली आहे. जमीन संपादनाच्या बदल्यात या जमिनीच्या मालकांना प्राधिकरणाकडून कोणत्या स्वरुपाची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. त्यामध्ये रोख रक्कम वा प्राधिकरण क्षेत्रामध्ये जमीन देण्यात आलेली असल्यास त्या बाबतची सर्व माहिती मिळावी.

## विवेचन

मौजे भोसरी येथील सर्व्हे क्र. २०/१ क, व सर्व्हे क्र.२०/३ हे क्षेत्र ता. ३०.४.१९७० रोजी तहसीलदार, हवेली यांनी पिंपरी चिंचवड शहर विभागातील औद्योगिक निवास व व्यापार विभागाकरिता संपादित केलेली आहे. त्यापैकी किती जमीन प्राधिकरण विभागाने संपादित केलेली आहे, या जमिनीच्या मालकांना प्राधिकरणाकडून कोणत्या स्वरुपाची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे, त्यामध्ये रोख रक्कम वा प्राधिकरण क्षेत्रामध्ये जमीन देण्यात आलेली असल्यास त्याबाबतची सर्व माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रशांत रामचंद्र खोल्लम यांनी जन माहिती अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे-४४ यांच्याकडे मागितली होती. ही माहिती त्यांना विहित मुदतीत दिली गेली नाही, म्हणून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांच्याकडे अपील केले. या अपिलाची दखल घेतली गेली नाही, म्हणून श्री. खोल्लम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १७ मार्च २००६ पर्यंत माहिती देणे आवश्यक होते, परंतु ती माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ११ दिवस उशिराने पाठविली. विभाग क्र.१ व विभाग क्र.२ यांच्याकडून सुमारे पंचवीस वर्षांपूर्वीची ही माहिती काढून द्यावयाची होती. त्यांच्याकडून ती दि. २०.२.२००६ च्या पत्राने मागितली व त्यांच्याकडून आल्यानंतर दि. २९.३.२००६ रोजी श्री. खोल्लम

यांना दिली, असे जन माहिती अधिकारी श्री. अनिल शं. काळे यांनी नमूद केले. म्हणजे माहिती देण्यास ११ दिवस विलंब झाला आहे, तसेच पूर्ण माहिती दिली गेलेली नाही, अशी अपीलकर्त्याची तक्रार आहे. भरपाई म्हणून १२.५ टक्के जमीन परतावा का दिला नाही, हा श्री. खोल्लम यांचा मुख्य प्रश्न आहे. उपरोक्त जमीन संपादन १९८४ पूर्वीचे असल्यामुळे १२.५ टक्के जमीन परतावा लागू होत नाही. १९८४ नंतरच्या संपादनांना तो लागू होतो, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या उत्तरात नमूद केले आहे. परंतु संपादित जमिनीच्या मालकांना कोणत्या स्वरुपाची नुकसान भरपाई देण्यात आली, त्यात रोख रक्कम वा जमीन असल्यास त्याचा तपशील अपीलकर्त्याने मूळ अर्जात मागितला आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी या तपशिलाची गांभीर्याने नोंद घेतलेली नाही. माहिती पंचवीस वर्षांपूर्वीची असली, तरी अत्यंत मर्यादित स्वरूपाची व नेमकी आहे. त्यामुळे विहित मुदतीतच ती द्यायला हवी होती.

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती सुनावणीपासून चार दिवसात द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. दि. १८.८.२००७ रोजी ही माहिती अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला कळविले आहे. म्हणजेच येथेही विलंबानेच माहिती दिली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित माहिती पुरविण्याबाबत ज्या विभागाच्या अधिकाऱ्यांना लिहिले ते जन माहिती अधिकारी ठरतात व म्हणून अपुरी माहिती देण्यास ते जबाबदार ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. आयोगाने ठरवून दिलेल्या मुदतीत माहिती न देणे व अपुरी माहिती देणे याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना रूपये १०,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. अशा अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याकडून समप्रमाणात ही शास्ती वसूल करुन दि.२०.१२.२००७ पर्यंत अहवाल आयोगाला पाठवावा. ही जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र.२८ निगडी, पुणे ४११०४४ यांची राहील.

३. माहिती देण्यास झालेल्या ११ दिवसाच्या विलंबाबद्दल केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ मधील कलम २० अन्वये जन माहिती अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र. २४, निगडी पुणे ४११०४४ यांना रुपये २५०/- प्रतिदिनी या प्रमाणे रूपये २७५०/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती वसूल करुन ती दि. १०.१२.२००७ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र.२८, निगडी, पुणे यांनी करून त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल दि. २०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

४. वरील कारवाईची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात करून अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांनी पूर्तता अहवाल आयोगाला दि. ३०.१२.२००७ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २१.११.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण कोंडीराम भिलारकर (कांबळे)
रा.५१९/२९५४, अक्षय सोसायटी, संत तुकारामनगर,
पिंपरी, पुणे-४११ ०१८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
महाबळेश्वर, जि. सातारा — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा निंवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, महाबळेश्वर, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण कोंडीराम भिलारकर (कांबळे)
रा.५१९/२९५४, अक्षय सोसायटी, संत तुकारामनगर,
पिंपरी, पुणे-४११ ०१८

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
महाबळेश्वर, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, महाबळेश्वर, जि.सातारा
प्रभारी श्री.अ. प. जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>(१) कुळ कायदा केस क्र.१९, भिलार १.७.१९६३ वेळेचा आदेश व जाब जबाब नकला.<br>(२) श्री.कोंडिबा कांबळे हे दि.१.४.१९५७ ला कायदेशीर कुळ असलेल्या पेठ्याचा हुकूमनामा टी.एन.सी.३१८, दि.१३.६.१९५७ च्या हुकमाची सत्यप्रत.<br>(३) फेरफार क्र.१५६९ बाबत मूळ अर्जाची झेरॉक्स व जाब जबाब नकला. | |

## विवेचन

भिलार, ता.महाबळेश्वर, जि.सातारा येथील श्री.कोंडिबा कांबळे यांच्या शेतजमिनीबाबतची कुळ कायदा केस क्र.१९ च्या संदर्भातील जाबजबाब आदी माहिती अपीलकर्ता श्री.नारायण कोंडिबा भिलारकर यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. आवश्यक कागदपत्रे न मिळाल्यामुळे श्री.भिलारकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, महाबळेश्वर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा यांच्याकडे अपील केले. त्यानंतरही माहिती न मिळाल्यामुळे श्री.भिलारकर यांनी राज्य माहि आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.भिलारकर यांनी मागितलेली माहिती सन १९५७ ते १९६३ या कालावधीतील आहे. कुळ कायदा केस क्र.१९, भिलार मध्ये दि.१.७.१९६३ रोजी झालेल्या आदेशाच्या व जाबजबाबाच्या नकला, श्री.कोंडिबा कांबळे हे दि.१.४.१९५७ ला कायदेशीर कूळ असलेल्या पेठ्याच्या हुकूमनाम्याची सत्यप्रत व फेरफाराच्या मूळ अर्जाची व जाबजबाबाची प्रत अशी माहिती श्री.भिलारकर यांनी मागितली होती. परंतु 'महाबळेश्वर तहसील कार्यालयाच्या अभिलेख कक्षात ही कागदपत्रे उपलब्ध नाहीत, ही कागदपत्रे या विषयासंबंधातील प्रकरणात उपविभागीय अधिकारी, वाई

यांच्याकडे सादर केल्याचे अभिलेख कक्षातील फेरीस्तवरुन दिसून येते. त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता ही कागदपत्रे या विषयाशी संबंधित प्रकरणासाठी विभागीय आयुक्त , पुणे विभाग, पुणे यांच्याकडे पाठविल्याचे समजते ', असे जन माहिती अधिकारी यांनी श्री.भिलारकर यांना कळविले. विभागीय आयुक्त कार्यालयात संपर्क साधून आवश्यक प्रती मिळवाव्यात, असे त्यांनी या उत्तरात म्हटले आहे.

सन २००१ पासून श्री.भिलारकर वरील कागदपत्रे मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. कुळ कायदा कलम ३२-ग चे प्रमाणपत्रावर श्री.कोंडिबा शिवराम कांबळे यांचे नाव आहे, तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय या जमिनीची विक्री, दान इ. कोणताही बदल करता येणार नाही, असा उल्लेख आहे. असे असताना ७/१२ उताऱ्यावर अन्य व्यक्तींची नावे लागली आहेत, ती कशी लागली, याची तपासणी होण्यासाठी व आपला हक्क शाबित करण्यासाठी आपल्याला ही कागदपत्रे आवश्यक आहेत, असे श्री.भिलारकर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. त्याच वेळी ही कागदपत्रे गायब केली गेली असावीत, असे त्यांनी अपिलात नमूद केले आहे. सन १९६३ साली ज्या लोकांनी कुळ कायद्याने जमिनी खरेदी केल्या त्यांची कागदपत्रे दप्तरी आहेत. परंतु फक्त आपलीच कागदपत्रे मिळत नाहीत, असाही उल्लेख त्यांनी केला आहे. उपविभागीय अधिकारी, वाई यांनी ही कागदपत्रे आपल्याकडे सादर करण्यात आली नसल्याचे उत्तर श्री.भिलारकर यांना दिले आहे. तसेच जिल्हाधिकारी, सातारा व उपविभागीय अधिकारी, वाई यांनी या जमीन प्रकरणी अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे सादर केलेल्या कागदपत्रात श्री.भिलारकर यांनी मागितलेली कागदपत्रे आढळून येत नाहीत, असे पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातील अभिलेखपालांनी श्री.भिलारकर यांना कळविले आहे.

श्री.भिलारकर यांनी मागितलेली कागदपत्रे सन १९५७ ते १९६३ इतक्या जुन्या कालावधीतील आहेत. श्री.भिलारकर यांच्यासह अभिलेखपालांनी शोध घेतला, परंतु ही कागदपत्रे आढळली नाहीत, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, महाबळेश्वर यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. अशा प्रकारे आपल्या समक्ष शोध घेतल्याचे श्री.भिलारकर यांनी मान्य केले, मात्र दाखविलेली कागदपत्रे पाहिली, संपूर्ण शोध घेतला, असे आपण म्हणू शकणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच केवळ आपलीच कागदपत्रे उपलब्ध कशी नाहीत, अशी शंका

श्री.भिलारकर यांनी सातत्याने लेखी व तोंडी व्यक्त केली आहे. या कागदपत्रांचा पुन्हा एकदा शोध घेण्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर यांनी स्वतः व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, महाबळेश्वर यांच्या वतीनेही मान्य केले. आयोगाने त्यासाठी त्यांना तीस दिवसांची मुदत दिली. उपविभागीय अधिकारी, वाई यांचेकडील अभिलेखामध्येही याच मुदतीत शोध घेऊन श्री.भिलारकर यांना आवश्यक असलेली माहिती द्यावी, असे आदेश आयोगाने दिले, व ते संबंधितांना कळविण्याच्या सूचना जन माहिती अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच तहसीलदार कार्यालय, महाबळेश्वर येथे श्री.भिलारकर यांना संबंधित सर्व अभिलेखाची पाहणी करु द्यावी, असाही आदेश आयोगाने दिला. त्यानुसार दि.८.७.२००७ व ११.७.२००७ रोजी तहसीलदार कार्यालय, महाबळेश्वर येथे आपण हजर राहिलो, कागदपत्रांचा शोध घेण्याचे काम सुरु आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, महाबळेश्वर श्री.राजाभाऊ माने यांनी सांगितल्याचे श्री.भिलारकर यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

श्री.भिलारकर यांनी मागितलेली माहिती सुमारे चाळीस वर्षांपूर्वीची आहे. परंतु संबंधित विषयाबाबत वाद असल्यामुळे अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे सदर विषय प्रलंबित आहे. ही कागदपत्रे सन २०२० पर्यंत जतन करुन ठेवावीत, अशी या विषयाशी संबंधित नस्तीबाबतची नोंद आहे. असे असताना ती उपलब्ध का होऊ शकत नाहीत? तसेच जर ही कागदपत्रे उपलब्ध नसतील तर उपविभागीय अधिकारी, वाई व जिल्हाधिकारी, सातारा यांनी चार वर्षांपूर्वी या विषयाबाबत आपल्याविरुध्द निकाल कशाच्या आधारे दिला?, असे प्रश्न श्री.भिलारकर यांनी उपस्थित केले. या पार्श्वभूमीवर संबंधित कागदपत्रे न मिळाल्यास आपल्याला न्याय मिळण्यात अडचणी येतील, असे श्री.भिलारकर यांचे म्हणणे आहे. गेली अनेक वर्षे हीच परिस्थिती असल्यामुळे संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसण्यास काय कारण आहे व कोण जबाबदार आहे, हे आपण सांगू शकणार नाही, असे उपस्थित अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

श्री.भिलारकर यांनी मागितलेल्या कागदपत्रांचा शोध जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी घेतला आहे, परंतु कुळ कायद्यांतर्गत जमीन खरेदीच्या तत्कालीन अन्य प्रकरणांमधील कागदपत्रे उपलब्ध असताना केवळ श्री.भिलारकर यांच्याच विषयाची कागदपत्रे मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती असल्यास ते निश्चितपणे संशयाला वाव देणारे आहे. या संदर्भात

त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न महत्त्वाचे असले तरी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील तो विषय नाही.

वरील निवेदनांचा व संदर्भांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

(१) अपील मान्य.

(२) श्री.भिलारकर यांनी मागितलेल्या कागदपत्रांचा विभागीय आयुक्त पातळीवरुन शोध घ्यावा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल दि.३०.१२.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १३.११.२००७**

प्रत::विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना आदेशातील कार्यवाहीसाठी पाठविणेत येत आहे.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड . जे.एम.पाटील — अपीलकर्ता
रा.१५/७, सिध्दिविनायक हाईटस् , विश्वेश्वर बँकेसमोर,
पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे ४११ ०४३

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१,
पुष्पा हाईटस, पुष्पमंगल कार्यालयाजवळ,
बिबवेवाडी, पुणे ४११ ००२ — उत्तरवादी
श्री.शरद जाधव

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक दुय्यम निबंधक हवेली नं.१,
पुणे तहसील कार्यालय आवार, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड . जे.एम.पाटील, रा.१५/७, सिध्दिविनायक हाईटस् , विश्वेश्वर बँकेसमोर, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे ४११ ०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१, पुष्पा हाईटस, पुष्पमंगल कार्यालयाजवळ, बिबवेवाडी, पुणे ४११ ००२, श्री.शरद जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

(१)मौजे नऱ्हे, ता.हवेली, जि.पुणे येथील खरेदी दस्त क्र.११४१३/९१, दि.२१.८.१९९१ ची मूळ प्रत मागणीसाठी अर्ज दि.२४.६.२००६ रोजी देऊनही गेल्या एक वर्षात हा दस्त का मिळू शकत नाही याचे खरे कारण समजून येत नाही. त्यासाठी आपले कार्यालयात रु.२००/- रक्कम भरुन मूळ दस्त देण्याचे कबूल करुनही मुद्दाम तो देण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे.

## विवेचन

मौजे नऱ्हे, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.२४/१+२+३+४+५+६+७यांसी क्षेत्र २ हेक्टर ५९ आर या मिळकतीचे खरेदीखत नोंदणीदस्त नं.११४१३/९१, दि.२२.०८.१९९१ ची मूळ प्रत अपीलकर्ता ॲड .जे.एम.पाटील यांनी दि.२४.०६.२००४ रोजी अर्ज देऊन जन माहिती अधिकारी तथा सहायक दुय्यम निबंधक हवेली नं.१ यांचेकडे मागितली होती, त्यासाठी लागणारी फी रु.२००/- भरलेली होती. प्रत न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१ यांचेकडे अपील केले, परंतु त्याची दखल घेतली गेली नाही, अशा कारणावरुन ॲड.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नावे दर्शविणारे फलक जिल्हा निबंधक अथवा त्यांच्या अखत्यारीतील अन्य कार्यालयात लावण्यात आलेले नाहीत, असेही ॲड.पाटील यांनी या अपिलात म्हटले आहे.

ॲड.पाटील हे निवृत्त तहसीलदार असून तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती पी.सी.पुठ्ठा यांनी आपल्या अर्जाची मुदतीत दखल घेतली नाही व आपल्याला शुल्क भरल्यानंतरही मूळ दस्तासाठी वेगवेगळ्या कर्मचाऱ्यांकडे पाठविले गेले, अशी ॲड. पाटील यांची तक्रार आहे. मात्र

राहिलेली नाही, असे ॲड.पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. तसेच जिल्हा निबंधकांच्या व त्यांच्या अखत्यारीतील २१ कार्यालयांमध्ये केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार आवश्यक ते फलक लावण्यात आलेले असल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१ श्री.शरद जाधव यांनी आपल्या निदर्शनास आणले आहे, असेही ॲड. पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक दुय्यम निबंधक हवेली नं.१ श्रीमती सी.पी.पुठ्ठ यांना माहिती मागणाऱ्या अर्जाबाबत विहित मुदतीत दखल घेण्याची समज देण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ८.११.२००७**